Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 19 November 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

येत्या २५ नोव्हेंबरपासून सुरु होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने २४ तारखेला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज सुरळीत चालण्यासंदर्भात सर्व राजकीय पक्षांच्या सहकार्याची मागणी या बैठकीत करण्यात येणार आहे. २० डिसेंबर पर्यंत हे अधिवेशन चालणार आहे.

****

नवी दिल्लीत गेल्या वर्षी झालेल्या जी-20 शिखर परिषदेची एक वसुंधरा, एक कुटुंब, एक भविष्य ही संकल्पना अद्यापही समर्पक असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ब्राझिलच्या रीओ दी जेनेरिओ इथं जी-20 देशांच्या शिखर परिषदेत, सामाजिक समरसता तसंच भूक आणि गरिबी निर्मुलन, या विषयावर आयोजित चर्चासत्रांत ते काल बोलत होते. जी-20 गटानं महिला नेतृत्व आणि युवकांना केंद्रस्थानी ठेऊन, सर्वसमावेशक विकासाला प्राथमिकता दिल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं. जागतिक स्तरावरील अनिश्चिततेचा परिणाम दक्षिणेकडील देशांत अन्न, इंधन आणि खतं या क्षेत्रावर होत असून, या मुद्यांना प्राथमिकता दिल्याखेरीज शिखर बैठकीतली चर्चा यशस्वी होणार नाही, याकडे त्यांनी जागतिक नेत्यांचं लक्ष वेधलं.

दरम्यान, जी-२० शिखर परिषदेत रिओ जाहीरनामा सादर करण्यात आला असून, यामध्ये जगभरातल्या विविध समस्यांच्या निराकरणासाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटन, इटली, फ्रांस, नॉर्वे, पोर्तुगल आणि इंडोनेशियाच्या प्रमुख नेत्यांची भेट घेतली. या देशांदरम्यान द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

****

गांधीनगर इथं राष्ट्रीय रक्षा विद्यापिठांत अखिल भारतीय पोलीस सायन्स काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाचं उद्घाटन, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज होणार आहे. मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यावेळी उपस्थित असतील. अमित शहा दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून, ते इतर काही कार्यक्रमांमध्येही सहभागी होतील.

****

भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक म्हणून के संजय मुर्ती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या शिक्षण मंत्रालयात उच्च शिक्षण विभागाचे सचिव म्हणून ते कार्यरत आहेत. ऑगस्ट २०२० पासून या पदावर असलेल्या गिरीश चंद्र मुर्मू यांची ते जागा घेतील.

****

राष्ट्रीय युवक महोत्सव ११ आणि १२ जानेवारी २०२५ रोजी, विकसित भारत युवा नेतृत्व संवाद म्हणून साजरा केला जाणार आहे. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी काल नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. या मंचामुळे देशातल्या युवकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्याची आणि आपला दृष्टीकोन त्यांच्यासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. देशभरातल्या युवकांमधून प्रतिभा शोधणं आणि तिचा विकास करणं हा यामागचा हेतू असल्याचं, मांडवीय यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं अवैध धंदे आणि पैशाची वाहतूक रोखण्यासाठी स्थिर आणि फिरत्या पथकांमार्फत वाहनांची तपासणी केली जात आहे. या अंतर्गत निवडणूक पोलिस निरीक्षक राजेश दुग्गल यांनी काल फिरत्या पथकाच्या माध्यमातून इतर वाहनांसोबतच पोलिसांच्या वाहनांचीही तपासणी केली.

****

रत्नागिरी जिल्ह्याच्या गुहागर तालुक्यातल्या अंजनवेल समुद्रकिनारी डिझेल तस्करी सुरू असताना पोलिसांनी नऊ आरोपींना रंगेहाथ पकडलं असून, त्यांच्याकडून बोट आणि टँकरसह एकूण दोन कोटी पाच लाख ९५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यातल्या काही किनाऱ्यांवर डिझेल तस्करी सुरू असल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

****

कलावंतांना आपली कला राष्ट्र सेवेसाठी समर्पित करण्याची प्रेरणा संस्कार भारती देते, असं प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी यांनी केलं आहे. ते काल बीड इथं संस्कार भारतीच्या कार्तिक पौर्णिमेनिमित्त घेतलेल्या कुटुंब मेळाव्यात बोलत होते. बीड इथल्या ऐतिहासिक दीपमाळेवर झालेल्या या कार्यक्रमात सहस्त्रदीपालंकार आणि गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

****

बिहारमध्ये सुरू असलेल्या महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना जपानशी होणार आहे. तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात चीन आणि मलेशिया यांच्यात लढत होणार आहे. या स्पर्धेतले पाचही सामने जिंकून भारत १५ गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

****

चीन खुल्या मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून शेनझेन इथं सुरुवात होत आहे. भारताच्या बी. सुमीथ रेड्डी आणि एन. सिक्की रेड्डी यांची मिश्र दुहेरीच्या ३२व्या फेरीत अमेरिकेच्या प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई यांच्याशी लढत होईल. भारताचे सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पुरुष दुहेरी स्पर्धेच्या पहिल्या फेरीत चायनीज तैपेईच्या जोडीशी सामना होईल. पुरुष एकेरीत, लक्ष्य सेनचा सामना सातव्या मानांकित मलेशियाच्या ली झी जियाशी होणार आहे. महिला एकेरीच्या लढतीत, पीव्ही सिंधूची थायलंडच्या सुपानिडा कातेथोंगशी लढत होणार आहे.

****

राज्याच्या बहुतांश भागात थंडीची चाहूल लागली असून, अनेक जिल्ह्यात किमान तापमानात घट झाली आहे. काल अहिल्यानगरमध्ये सर्वात कमी म्हणजे १२ पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या २४ तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****